ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# "बहुविध संस्कृती असणाऱ्या समाजासाठी शिक्षणाची जबाबदारी व शिक्षकांची भूमिका"

**शिंदे ज्ञानेश्वर नवल**
निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, जि.पुणे.

**प्रस्तावना**

ज्या समाजामध्ये चांगले बोलणे, वागणे, चांगला सामाजिक दर्जा, शिष्टाचार, शिक्षण, उदात्त विचार व आचार पद्धती, वेशभूषा, चांगले खाणे पिणे, चांगले कला गुण भाषा असेल त्यास सुसंस्कृत समाज म्हणता येईल. 'समाजमान्य वर्तन' हा संस्कृतीचा गाभा आहे. भारत हा बहुविध संस्कृतीने नटलेला देश आहे.

**संस्कृती अर्थ**

**१.संस्कृत**

सं = सम्यक, स्कृ = कृती यावरून चांगले करण्याची कृती किंवा प्रक्रिया म्हणजे संस्कृती.

**२.विनोबा भावे**

संस्कृत म्हणजे सत्कृत्यांची परंपरा.

**३.शंकराचार्य**

संस्कार याचा अर्थ गुणांची स्थापना व दोषांचे निराकरण होय. सद्‌गुणांची वृद्धी व दुर्गुणांचा नाश करण्याच्या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे संस्कृती.

**संस्कृतीची वैशिष्ट्ये**

१.संस्कृती ही एक संकीर्ण म्हणजेच गुंतागुंतीची बाब असून त्यामध्ये अनेक गोष्टींचा समावेश होतो.

२.संस्कृतीत भौतिक आणि अभौतिक अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो.

३.संस्कृतीतील विविध गोष्टी व्यक्ती समाजाचा एक सभासद या नात्याने शिकून घेतो.

४.संस्कृती हा मानवनिर्मित वातावरणाचा भाग आहे.

५.संस्कृती ही समाजाच्या सामूहिक मालकीची असते. म्हणून संस्कृतीस सामाजिक वारसा म्हणून संबोधले जातो.

६ .एक पिढी आपली संकृती दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करत असते .

७ .प्रत्येक समूहाची/समाजाची विशिष्ट अशी संस्कृती असते .

८ .संस्कृती परिवर्तनशील असते . काळाप्रमाणे संस्कृतीचे स्वरूप बदलत असते .

**बहुसांस्कृतिक समाज – व्याख्या आणि अर्थ**

१ .'ज्या समूहात, ज्या समाजामध्ये विविध प्रकारच्या भाषा बोलणारे विविध पंथाचे, धर्माचे, जातीचे लोक राहतात . विश्वास, उपासना, कला, रूढी, परंपरा, नितीनियम, क्षमता आणि सवयी ही विविधता संस्कृतीच्या रूपाने आढळते . या समाजाला बहुसांस्कृतिक समाज असे म्हणतात'


उदा .विविध भाषा बोलणाऱ्या लोकांची, विशिष्ट पद्धतीने जीवन जगणाऱ्या लोकांची एक वेगळी संस्कृती तयार होते आणि अशा अनेक संस्कृती एकत्र राहतात तेंव्हा त्याला बहुसांस्कृतिक समाज असे म्हणतात .

२ .तंत्रविज्ञानाच्या शोधामुळे, संप्रेषणाच्या सुलभतेमुळे संपूर्ण विश्व एक समाज किंवा खेडे आहे असे आपण म्हणतो या अर्थाने संपूर्ण विश्व बहुसांस्कृतिक समाज आहे .

उदा .१९१ देशात ६८00 भाषा प्रचलित आहेत . प्रत्येकी २२६१ भाषा लिहिल्या जातात . ४५३९ भाषा बोलल्या जातात . भारतात एकूण १६५२ भाषा बोलल्या जातात . हे भाषिक वैशिष्टय आहे .

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES • 2012 • SRJIS

जगात एकूण १३ धर्म आढळतात. वेगवगेळया संस्कृतीच्या एकत्रीकरणात काही नव्या संस्कृतीची घडण होते. उदा.सतीची चाल बंद केली. महिला सशक्तीकरणाच्या माध्यमातून समाजाची पुर्नरचना केली हे सांस्कृतिक बदल होत. यातून संकरीत संस्कृती निर्माण होत आहे. उदा.योग शिक्षण परदेशात गेले आहे.




## सांस्कृतिक विविधता

### १.भाषा

भाषेला संस्कतीत अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय राज्यघटनेत एकूण १८ भाषांना प्रमुख भाषा म्हणून मान्यता दिली. परंतू भारतात एकूण १६५२ भाषा बोलल्या जातात.

### २.धर्म

जगात ख्रिश्चन धर्माचे लोक जास्त आढळतात. मात्र ८0‰ ते ८२‰ हिंदू धर्म आढळतो.

| अ.क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १0 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धर्म | ख्रिश्चन | रोमन कॅथॉलिक | इस्लाम | हिंदू | बौद्ध | शीख | ज्यू | जैन | आर्थोडॉक्स | आदिवासी |
| शेकडा | ३३.६ | १८.७ | १८.२ | १३.५ | 0६.0 | 00.३ | 00.२ | 00.५ | 0३.१ | 0१.७ |

**३.सण व उत्सव**

१.बौद्ध - बुद्धपौर्णिमा, आंबेडकर जयंती २.हिंदू - गुढीपाडवा, मकर संक्रांत ३.शीख - गुरूनानक जयंती

४.ख्रिश्ती - नताळ

**४.कला**

लाल किल्ला, ताजमहाल, अजंठा-वेरूळ, कुतूबमिनार, अशोक स्तंभ, वैष्णवदेवी मंदीर, मदुराई मिनाक्षी मंदीर, कैलास मंदीर

**५.साहित्य**

रामायण, महाभारत, भगवत्‌गीता

**सांस्कृतिक विविधतेमध्ये शिक्षणाची जबाबदारी**

**१.विविध संस्कृतीच्या वैशिष्टयांची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे**

भाषा, साहित्य, कला, सण, उत्सव, धर्म, राहणीमान, रूढी, परंपरा, नीती नियम, खेळ, सहली, सांस्कृतिक कार्यक्रम, वैश्विक व शाश्वत मूल्यांचा अभ्यास इ. वैशिष्टयांची ओळख करून देणे गरजेचे आहे.

**२.स्वतःच्या व इतरांच्या संस्कृतीबद्दल आदराची भावना व्यक्त करणे**

वेगवेगळे सण, उत्सव, प्रकल्प, सहली, निरीक्षण इ. माध्यमातून ऐकमेकांच्या कार्यात व धार्मिक कार्यात सहकार्य करणे. इतरांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून शिक्षकाने असे कार्यक्रम स्वतःबरोबर घ्यावेत. माणसाने माणसांसाठी माणसारखे वागावे. समानता, न्याय इ.तत्त्वे व धर्मातील सामर्थ्य समजावून सांगावे. थोर नेते, व्यक्ती यांच्या चरित्राचे वाचन करावे. सांस्कृतिक आदर वाढवणारे उपक्रम हाती घ्यावेत.

**३.कोणत्याही संस्कृतीचे वस्तूनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी मार्गदर्शन करणे**

प्रत्येक संस्कृतीतील चांगले काढून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्वतःच्या चुकाही मान्य करणे गरजेचे आहे. उदा.काही धर्मातील रूढी, परंपरा अनिष्ठ होत्या त्या मान्य करायला हव्यात व सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**४.विविधतेतून एकता साधण्याचा प्रयत्न करणे**

एकात्मता ही इमारत सारखी दगड व विटांनी बांधता येत नाही. तर ती संस्कारतून बांधली पाहिजे. एकता म्हणजे लोकमाणसांत दृढ ऐक्य भावनेचा विकास करणे. आपण सारे एकाच राष्ट्राचे आहोत ही जाणीव निर्माण करणे. भाषा, पंथ, धर्म यात राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करणे.

**५.नवा आदर्श एकात्म विश्व समाज घडविण्यासाठी दिशा देणे**

जुनाट रूढी परंपरांना चिकटून राहणे हिताचे ठरणार नाही. त्यामुळे जीवन पद्धतीत बदल करणे. परंपरा, नवीन पायंडे, नव्या मूल्यांची निर्मिती केली तरच समाजाची व राष्ट्राची प्रगती होऊ शकेल.

**अभ्यासक्रमाचे स्वरूप**

- अभ्यासक्रमामध्ये सर्व संस्कृतीत स्थान असते.
- संस्कृतीमधील चांगल्या बाबी मांडण्याचा प्रयत्न.
- संस्कृती परिवर्तनाची योग्य दिशा दिली जावी.
- इतर संस्कृतीचे अंधानुकरण होऊ नये.
- भाषा, सण, उत्सव याबाबत माहितीपट तयार करावेत.
- सांस्कृतिक वैशिष्टयांवर आधारित प्रकल्प तयार करावेत.
- चर्चा, वादविवाद, सेमिनार यामधून सांस्कृतिक विकास साधावा.
- जीवन जगण्याची कला आत्मसात व्हावी.
- विविध भाषेतील अभिजात वाड्मयाचा अभ्यास करणे.
- शाश्वत मूल्यांची जोपासना करणे.
- बौद्धिक विकासाबरोबर व्यक्तीचा मानसिक, भावनिक व नैतिक विकास साधने.

**शिक्षकाची भूमिका**

- विविध संस्कृतीची ओळख असावी.
- जेवढी माहिती जास्तीत जास्त मिळवता येईल तेवढी मिळवावी.
- संस्कृतीतील दोष व बलस्थाने माहित असावीत.
- संस्कृतीचे निपक्षपातीपणे वस्तूनिष्ठ मूल्यमापन करणे.
- विद्यार्थ्यांना सतत प्रेरित करावे.
- अंधानुकरण करू नये यासाठी शिक्षक जागरूक हवा.
- भदलाच्या दिशेने नेहमी पुढे पाऊल उचलावे.
- विद्यार्थ्यांचा तो मित्र, मार्गदर्शक, सल्लागार असावा.
- शिक्षकाच्या अंगी गुणग्राहकता, निपक्षपाती विचार, चिंतनशीलता, वस्तुनिष्ठपणा हे गुण असावेत.

**संदर्भ ग्रंथ**

१.कुंडले, मं.बा. (२००३). शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, विद्याप्रकाशन, दाहावी आवृत्ती, पुणे.

२.करंदीकर, सुरेश आणि मंगरूळकर, मीना (२००५). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३.दुनाखे, अरविंद (२००७). प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.

४.सांगोलकर, अरूण (२०१०). नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचार प्रवाह, इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक.